# आनंदी दिवस

प्रकाशित: शब्दसंस्कार दिवाळी अंक २०१२

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** [http://www.rajratna.co.in](http://www.rajratna.co.in) **Email:** [ratnakar.wani@rajratna.co.in](mailto:ratnakar.wani@rajratna.co.in)

# आनंदी दिवस

एरव्ही धीर गंभीर व चिंताग्रस्त वाटणारे आनंदराव आज फारच खुशीत होते. ते खुशीतच त्यांचे उपाध्याय, जोशी गुरूजींकडे आले. त्यांचा प्रसन्ना व आनंदी चेहरा पाहून जोशी गुरूजी आश्चर्य करित म्हणाले, " काय आनंदराव आज बरेच खुशीत दिसता आहात. काय लॉटरी वगैरे लागली की काय? का कोणाचे लग्न वगैरे जुळवता आहात? काय काम काढले आमचेकडे एवढया दिवसांनी?"

जोशी गुरूजींच्या या वक्तव्याने खुशीत त्यांचा चेहरा अधिकच उजळला. समोर खुर्चीत स्थानापन्ना होत ते म्हणाले, "लॉटरीच लागली समजा. म्हणूनच सत्यनारायणाची पूजा करावी म्हणतो".

यावर जोशी गुरूजी आश्चर्यचकित होत बसल्या जागी जवळ जवळ उडालेच व म्हणाले, "काय श्री. सत्यनारायणाची पूजा, काय सांगता काय ? " लगेच स्वतःला सावरीत जोशी गुरूजी म्हणाले, " बरं ते जाउ द्या. बोला आता. "

आनंदराव खुलासा करित म्हणाले, "अहो गुरूजी, गेल्या दोन महिन्यात आमच्या कुटुंबात एक नाही, दोन नाही तब्बल चार आनंदी घटना घडल्या आहेत. म्हणून आमचेसाठी आमचे हे दिवस आनंदाचेच दिवस आहेत. "

"अहो, काय त्या घटना आम्हाला तरी कळू देत की!" गुरूजींनी पृच्छा केली.

"अहो एक महिन्यापुर्वी आमची कन्या सुनिताला पुत्र रत्न प्राप्त झाले. त्याचे पेढे वाटून होतात न होतात तोच आमचा धाकटा मुलगा महेशचा बी.ई.चा निकाल जाहिर झाला. तो चांगल्या मार्कांनी पास झाला. पाच सात दिवसाचा अवधि जातो न जातो तोच सुरेशला त्याचे कंपनी चा वैभव ॲवार्ड जाहिर झाला. आणि याच महिन्यात आमची स्नुषा सुरेशची पत्नी, सुनिताची तिच्या बॅंकेत मॅनेजरचे

पदावर पदोन्नती झाली. मग तुम्हीच सांगा आम्हाला आनंद झाल्या शिवाय राहिल काय?" आनंदरावांनी मोठया उत्साहाने व आनंदाने सर्व घटना सांगितल्या.

"काय छान योग जुळुन आलेत बघा. तुमचे सर्वांचे हार्दिक अभिनंदन ! या यशांमागे मुलांची जिद्द, मेहनत आणि दैवाची साथ आहे हे विसरून चालणार नाही. एकंदरित तुमच्या राशी भविष्यामधील भाग्याचे दिवस, शुभ वार्ता कळतील, दिवस आनंदी ठरेल अशी भविष्यवाणीची वाक्ये भविष्यकार व वृत्तपत्रवाले काढायची विसरलेला दिसतोय". गुरूजी गमतीने म्हणाले.

" बरंय, बोला आता तुमची काय सेवा करू?" विषयाला हात घालीत गुरूजी म्हणाले.

"या आनंदाप्रित्यर्थ मी श्री.सत्यनारायणाची पूजा घालू म्हणतो. तर मला येत्या ८-१० दिवसात चांगला शुभ मुहुर्त सांगा" आनंदराव म्हणाले.

गुरूजी कौतुक करित म्हणाले, "व्वा! छान कल्पना आहे. पण श्री.सत्यनारायणाच्या पूजेसाठी कोणताही मुहुर्त लागत नाही. ती केव्हाही व कोठेही करता येते. याचा उल्लेख श्री. सत्यनारायणाच्या पोथीत व इतर ठिकाणी पण आढळतो. तरी पण तुमचा आग्रहच असेल तर सांगतो." असे म्हणत पंचांगातील एका पंधरवडयातील शुक्ल पक्षातील दर्शविल्या प्रमाणे काही शुभ दिवस व चांगले दिवसांचा प्रस्ताव त्यांच्यापुढे मांडला.

पण एकही दिवस त्यांना सोयीचा वाटला नाही. मुलांना सुटी नाही, मुलगी, जावई येउ शकत नाही किंवा अन्य कारणांनी तर काही ठिकाणी गुरूजींना वेळ नाही या मुळे रद्द झाले. शेवटी गुरूजीनी अमुक एक दिवस आनंदी दिवस आहे त्या दिवशी मला पण जमेल व इतरांना पण सोयीचे ठरेल म्हणत त्या आनंदी दिवसा वर ब-याच उहा पोहानंतर शिक्का मोर्तब झाले.

ठरल्या प्रमाणे एका शनिवारी श्री.सत्यनारायणाची पूजा यथासांग पार पडली. यजमान गुरूजी व सर्व कुटुंबीय संतुष्ट झाले. स्त्रीयांचा पूजेनंतर नाव घेणे सारखा पारंपारिक कार्यक्रम हास्यविनोदात पार पडला. एकंदरित घरात सर्वत्र आनंदी वातावरण होते व सर्वच आनंदात होते. दुपारची जेवणे झाली. कोणालाच वेळेचे बंधन नसल्यामूळे जोशी गुरूजी समवेत गप्पांची मैफिल रंगली व आजचा आनंदी दिवस पूजेस कसा धरला गेला यावर थोडक्यात सांगितले.

बोलता बोलता जोशी गुरूजी म्हणाले. “आनंदी दिवस म्हणजे तरी काय? तर जो दिवस आपल्याला सुखावतो, मनाला अंतरिक आनंद व सुख देउन जातो तो आनंदी दिवस. आनंद केव्हा होतो, जेव्हा आपले मन व चित्त प्रसन्न असते, स्थिर असते व त्यावेळी घडणा-या सुखदायक घटनांशी आपण एकरूप झालेले असतो व तेव्हा कळत न कळत आपणास आनंद होतो. आताचेच ताजे उदाहरण द्यायचे झाल्यास, पूजेनंतर जेव्हा महिलांनी व काही पुरूषांनी नावे घेतली तेव्हा काही विनोद झालेत. त्यावेळी आपणा सर्वांचे चित्त व मन प्रसन्न होते आणि या कार्यक्रमावर केंद्रित झाले होते. आपल्या मनात येथील आनंददायक घटने शिवाय कोणतेही दुसरे विचार नव्हते, म्हणून आपण त्या विनोदांना दाद दिलीत त्याची मजा अनुभवली. सोबत आपण या कार्यक्रमाचा आनंद पण घेउ शकलो.

प्रेम व प्रेमाने केलेले स्मितहास्य हे आनंद मिळविण्यासाठीचे पूरक घटक मानले जाउ शकतात. दोन व्यक्ती भेटल्यास त्यांची मने जुळलीत, आपसात प्रेमळ संवाद साधला गेल्यास उभयतांना त्या भेटीतून आनंद मिळतो व भेटीचा दिवस आनंदी दिवस ठरतो.

आपण स्टार कलाकार कै. राजेश खन्ना यांचा आनंद हा हिंदी चित्रपट पाहिला असेल यात. राजेश खन्नांनी आनंदची भुमिका साकारली आहे. चित्रपटात ते रस्त्याने चालणा-या अनोळखी गृहस्थास, ज्याच्या ह्रदयाची तार त्यांच्या ह्रदयाशी जुळते, त्यांना “ ए ऽ ऽ बाबु मोशाय” असे हाक मारतात. त्याच्याशी दोन प्रेमाच्या गोष्टी करतात. स्वतः जिवनाचा आनंद घेतात व दुस-याला देतात. पण जर एखादी अप्रिय व्यक्ती जिच्याशी आपले मन जुळत नाही, जुळले नाही ती व्यक्ती आपणास भेटीची इच्छा असतांना किंवा नसतांना देखिल भेटली तर, आनंद मिळत नाही. हे सांगणे नोहे.

प्रेम कसे वाढवावे, कसे वाटावे व त्यातून आनंद कसा मिळवावा या बाबतीत एक गोष्ट आठवते. दोन मित्र टॅक्सीने प्रवास करित होते. प्रवासात टॅक्सी चालकाने अति वेगाने व बेदरकार पणे टॅक्सी चालविली. चालवतांना त्याने एका भाजीवाल्या गाडीला धडक देउन त्याचे नुकसान केले. प्रवास संपल्यावर त्यातील एकाने चालकाचे भाडे, त्यावर बक्षिसी व त्याचे आभार मानत म्हणाला " फार छान! एवढया रहदारीच्या गर्दीमध्ये पण सफाईदार व सुरक्षित ड्रायव्हिंग केलेस."

यावर दुस-याने त्याला विचारले, " अरे हे काय केलेस तु तुला समजते का ? वेडाबिडा तर झाला नाहीस ना ? अरे! इतकी बेदरकार पणे टॅक्सी चालविली की दोनवेळा माझे डोके छताला भिडले. एका भाजीवाल्या गाडीला धडकला. तरी तु म्हणतो छान चालविली व शिवाय बक्षिस पण दिले."

यावर पहिल्याने उत्तर दिले. "त्याने कशीही टॅक्सी चालविली तरी माझ्या या प्रेमळ वक्तव्यांनी त्याच्या अंगावर मुठभर मास चढेल. तो सुखावेल त्याला मनोमनी आनंद मिळेल. यापुढे त्याला मिळणा-या दहा ग्राहकांना तो चांगली सेवा देईल. मी केलेली प्रशंसा ५ १० जणांना सांगेल. ते सुखावतील त्यांना आनंद मिळेल. घरी जातांना आपल्या मुलाबाळांसाठी खाऊ घेउन जाईल ते आनंदतील. बायकोला सांगेल ती सुखावेल. तिला आनंद होईल. ती आपल्या शेजा-यांना सांगेल ते सुखावतील. माझ्या प्रेमळ कौतुकास्पद दोन शब्दांनी कमित कमि २० जण तरी सुखावतील ते आनंदतील. त्या सर्वांचा दिवस आनंदात जाईल. अशा प्रकारे प्रेम व आनंद सगळीकडे पसरेल व वातावरण आनंदी होण्यास मदत होउ शकेल.

हे केवळ मानवांच्या बाबतीतच नाही तर रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेल्या श्वानास किंवा पशुपक्षास देखिल प्रेमाने उचलून मदत केली तर ते सुखावतील. त्यांना आनंद तर होईलच शिवाय कळत न कळत प्रेमाची व आनंदाची भावना निसर्गात पसरेल.

आनंद मिळविण्यासाठी एक स्मित हास्य देखिल पुरेसे ठरू शकते . एखाद्या व्यक्तिकडे प्रेमाने पहात स्मित हास्य केले तरी उभयतास आनंद मिळू शकतो व उभयताचा दिवस आनंदी जाउ शकतो .

लहान बालक ज्याला काही समजत नाही, बोलता येत नाही अशा बालकाकडे पाहून केवळ स्मित हास्य केलेत तर ते बालक पण प्रतिसादात्मक हास्य करून आपल्याला आनंद झाल्याची पावती देते . अशा निरागस बालकाच्या ठायी कोणतीही लटकी खोटी आवरणे नसतात . ते केवळ एक निरागस निष्पाप व आपपर भाव नसणारे, अहंकार, अभिमान यांपासून दूर असणारे बालक असते . त्याला आपल्या प्रेमळ स्मित हास्याने आनंद मिळतो . तोच आनंदाचा ठेवा आपल्याला दिवसभर पुरतो व आपला दिवस आनंदी बनू शकतो .

स्मित हास्य हा दोन जिवांमधला दोन जिवांना जोडणारा अवचित दुवा आहे . प्रतिष्ठा, मान, सन्मान, अहंकार, अभिमान ही मानवाने चढविलेली आवरणे आहेत . या आवरणांखाली आपला खरा आत्मा लपलेला असतो आणि केवळ स्मित हास्याने दोन आत्म्यांची ओळख होत गेली तर शत्रूत्व तर नष्ट होईलच परंतु एकमेका प्रती प्रेम, आनंद, सदभाव व सहानुभुति निर्माण होईल . अशीच प्रेमाची व स्मित हास्याची देवाण घेवाण होत राहिल्यास मानवी जीवन आनंदी बनेल व सर्वच दिवस आनंदाचे बनतील .

जोशी गुरूजींच्या या छोटयाशा महत्वपूर्ण माहितीने सर्व कुटुंबिय सुखावले व आजच्या आनंदी दिवसाची अनुभुति त्यांना आली .